MHNS130001882012

नियमित दिवाणी दावा क्र. ४५/२०१२
मनोहर गांगुर्डे वि. वसंत गांगुडे व इ.

## निशाणी क्रमांक १६९ वर आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज **प्रतिवादी क्र. १अ अरविंद वसंत गांगुर्डे व २इ. सुमन लक्ष्मण गरुड** हे मयत झाल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या अर्जातील कथनाप्रमाणे सदर दाव्यातील **प्रतिवादी क्र. १अ अरविंद वसंत गांगुर्डे** हे दि.१३.०५.२०२० रोजी व **२इ. सुमन लक्ष्मण गरुड** ही दि. ११.०६.२०१० रोजी मयत झाली असून आजपावेतो त्यांचे वारस रेकॉडवर घेणे आवश्यक होते. परंतु त्यांच्या मृत्यूचे दाखले मिळवून, वारसांबाबत माहिती मिळणेस विलंब झाल्याने त्यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणू शकले नाहीत. त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झाल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी नं.१अ व प्रतिवादी २इ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी वादी यांनी हेतुपुरस्कर विलंब केलेला नाही. सदरचा अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर होणेविषयी वादी यांनी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१, १ब, २, ३, ३क, ३ड यांच्यातर्फे विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावर योग्य तो आदेश होण्याची हरकत नसल्याचे कथन केले.

४. वादी यांचा अर्ज, त्यास प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचे म्हणणे, तसेच दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे अवलोकन केले असता अर्जातील नमुद विलंबाचे कारण हे योग्य व संयुक्तिक दिसून येते. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.१अ व प्रतिवादी क्र.२इ चे वारस हे दाव्यात आवश्यक पक्षकार असल्याने न्यायाचे हितास्तव त्यांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच, दाव्याची अनेकता व कार्यबाहुल्य टाळणेसाठी देखील प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे योग्य व न्यायोचीत होईल. प्रतिवादी क्र.१अ व प्रतिवादी क्र.२इ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस वादी यांना विलंब झालेला असल्याने त्यांच्यावर खर्च लादणे येथे योग्य व संयुक्तिक होईल.

५. सबब, सदरचा वादी यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र असलेने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे —

**आ दे श**

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रु. १०००/— (रुपये एक हजार मात्र) खर्च तालुका विधी सेवा समिती यांच्याकडे अदा करणेचे अटीवर मंजूर करणेत येतो.

**सही /—XXX**
**( व. वा. खेंदाड )**

दिनांक :— ०२/०४/२०२६.
ठिकाण :— पिंपळगाव(ब)

२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पिंपळगाव(ब)